नि.फौ.ख.क्र.३७१/२०२५
सरकार –वि– शेख समद
<u>निशाणी क्रमांक २६</u>

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०७ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– विभा निकेश जैन
वय :– ३० वर्ष, व्यवसाय :– गृहीणी,
राहणार :– शेगांव, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. आम्ही दिनांक २७.०२.२०२५ रोजी गुजरात येथे गेलो व दिनांक ०५.०३.२०२५ रोजी ११.३० ते ११.४५ वाजेच्या दरम्यान आम्ही परत आलो. आम्ही परत आल्यावर मुख्य दरवाजा तसाचा तसा होता, तो उघडत नव्हता, आतुन बंद होता. त्यांनतर आम्ही मागचा दरवाजा पाहिला असता त्या दरवाज्याला मागुन कडी लावलेली होती. त्यानंतर माझ्या सासुने त्या दरवाज्याची कडी उघडली व आम्हाला आवाज दिला. त्यानंतर घरात प्रवेश केला असता सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. सर्व सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले. गाद्या खाली पडलेल्या होत्या, अलमारीतील सामान खाली पडलेले होते. घरातील दोन गोदरेजच्या अलमारीतील सर्व सामान खाली पडले होते. एका अलमारीत कपडे, सोने, चांदी नगदी ८०,०००/– रुपये होते. माझी व माझ्या मुलीची सोन्याची चैन, चांदीचे कमरपटटा, चांदीचे चाळ दोन, सोन्याचे झुमके, सोन्याची अंगठी इत्यादी सामान ठेवलेले होते ते दिसुन आले नाही. अंदाजे दोन ते अडीच लाखाचे सामान चोरी गेले होते. घटनेची फिर्याद माझ्या पतीने दिली. पोलीसांनी दुस–या दिवशी माझे बयाण नोंदविले. चोरी गेलेला मुददेमाल परत मिळाला नाही. सदर मुददेमाल कोणी चोरला हे मला माहीती नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.मिरगे वकील साहेब यांचेमार्फत.</u>**

२. फिर्यादी माझे पती आहे ते आज माझेसोबत आलेले आहे. हे म्हणने खरे नाही की न्यायालयात काय साक्ष द्यायची याबाबत घरी चर्चा केली. पोलीसांनी माझा जबाब दुस–या दिवशी घेतला होता. पोलीसांना जबाब देतांना मी असे सांगीतले होते की, तो दरवाजा उघडत नव्हता, सासुने कडी उघडली व आम्हाला आवाज दिला. सदर बाब माझे जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे नाही की मला फिर्यादीने जसे सांगीतले तशी मी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. .

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.04.13 15:19:56 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १३.०४.२०२६.**

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १३.०४.२०२६**